Re-accredited by NAAC
(2014) With CGPA-3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परीपत्रक

सर्व संलग्निंत बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी., बी. सी. एस., बी. बी. ए. व बी. सी. ए. महाविद्यालयातील प्राचार्य / प्राचार्या / संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठामधील परीक्षांचे निकाल विहीत मर्यादेत घोषित होत नाहीत यामुळे विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा विचार करता मार्च/ एप्रिल 2015 या सत्रामधील परीक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित होण्यासाठी येणा-या अडचणी विचारात घेता खालील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी ही विनंती.

1. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील सर्पूर्ण माहिती (बैठक कमांक, व विषय सांकेतांक, परीक्षा केंद्र, प्रश्नपत्रिका कोड क. इ.) परीक्षार्थीने अचूक भरली आहे यांची खात्री करूनच कनिष्ठ पर्यवेक्षकाने त्या उत्तरपत्रिकेवर स्वाक्षरी करावी. हजेरी रिपोर्ट (Junior Supervisor Report) बिनचुक लिहीण्याची जबाबदारी ही कनिष्ठ पर्यवेक्षकांची असून हजर , गैरहजर व परीक्षा प्रमाद परीक्षार्थींचे लिहिलेले बैठक कमांक बरोबर आहेत याची खात्री करून घ्यावी. यासाठी सर्व कनिष्ठ पर्यवेक्षकाना सुचना देण्यात याव्यात.
2. परीक्षा संपलेनंतर उत्तरपत्रिका वरिष्ठ पर्यवेक्षकांनी कनिष्ठ पर्यवेक्षकाडून स्विकारून प्रश्नपत्रिकेच्या कोड निहाय सिलबंद पाकिटे करून त्यावर विषयाचे नाव व प्रश्नपत्रिका कोड क. सुस्पष्ट नमूद करून त्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर लॉटच्या तारखेनुसार जमा करावयाच्या आहेत. यासाठी सर्व वरिष्ठ पर्यवेक्षकाना सुचना देण्यात याव्यात.
3. मा. प्राचार्य यांनी वरिष्ठ पर्यवेक्षकांनी मुल्यमापन केंद्रावर पाठविलेल्या उत्तरपत्रिकेंच्या विषयांची माहिती घेवून त्या विषयाच्या नियमीत शिक्षकांना अन्य परीक्षेच्या / महाविद्यालयाच्या कामातुन कार्य मुक्त करून तात्काळ मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर मूल्याकनांच्या कामासाठी प्राधान्याने पाठविण्यात यावे.
4. आपल्या महाविद्यालयातील परीक्षार्थीच्या उत्तरपत्रीका मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर पाठविल्यापासून जास्तीत जास्त 10 दिवसात मुल्याकनांचे कामकाज पूर्ण करून घेण्याची जबाबदारी आपण व्यक्तीशः घ्यावी व आपल्या शिक्षकांना On Duty मूल्यमापनकामासाठी सोडावे.
5. तसेच संबधित मुल्यमापन केंद्रावरून आवश्यकते नुसार आणखी परीक्षक /परीनीरीक्षक यांची मागणी असल्यास त्यांना प्राधान्याने पाठविण्यात यावे
6. परीक्षार्थीच्या उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी जे शिक्षक टाळाटाळ करतील अशा शिक्षकांची नावे विद्यापीठास कळविण्यात यावीत. जेणेकरून त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई करणे शक्य होईल.
7. मूल्याकंनाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयातील परीक्षक/ परीनिरीक्षक यांनी केलेल्या मूल्याकंनाच्या कामकाजाची तपशीलवार माहिती मध्यवर्ती मुल्यमापन विभाग, परीक्षा भवन -2 शिवाजी विद्यापीठ, यांचेकडे पाठविण्यात यावी.

तरी मार्च/ एप्रिल 2015 या सत्रामधील परीक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित होण्यासाठी उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी सदरचे परिपत्रक सर्व संबधिताच्या निदर्शनास आणावे ही विंनंती.

आपला विश्वासू,

(श्री एम. ए. काकडे )
मा. परीक्षा नियंत्रक

जा. क. शिवाजी वि./ममूवि/कॅप/5721
दि. 27/03/2015

प्रति,

1.सर्व संलग्निंत महाविद्यालयातील प्राचार्य / प्राचार्या / संचालक यांना कार्यवाहीसाठी
2. मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय
3. सर्व उपकुलसचिव, सहा. कुलसचिव व विभाग प्रमुख, परीक्षा विभाग
4. इंटरनेट विभाग (संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी )